

गुरुवार दि.२२ ऑगस्ट२०२४

किंमत २ रुपये | महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१ अंक : ३५३

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com


# बदलापूर प्रकरणी सर्व विरोधी पक्ष एकवटले

# २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक

## महाविकास आघाडीच्या बैठकीत निर्णयाची पटोलेंची माहिती

**बदलापूर येथील शाळेत २ चिमुकल्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर विरोधी पक्षांची महाविकास आघाडी चांगलीच आक्रमक झाली आहे. महाविकास आघाडीने या प्रकरणी बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी निदर्शने करत येत्या शनिवारी म्हणजे २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे.बदलापूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या जागा वाटपाची बैठक रद्द करुन त्या ऐवजी, राज्य सरकारच्या विरोधात आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संबंधीची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेत दिली. महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. राज्यात आता लहान मुलीही सुरक्षित नाहीत. बदलापूरची घटना मानवतेला काळीमा फासणारी आहे. या घटनेला दाबण्यासाठी सरकारने स्वतः प्रयत्न केले, हे या प्रकरणी निदर्शनास येत आहे. घटना घडली ती संस्था आरएसएस व भाजपशी संबंधित आहे. त्यामुळे या दोन्ही संघटनांची बदनामी टाळण्याचा प्रयत्न सरकारकडून केला गेला. त्याचा उद्रेक कालच्या घटनेतून झाला,असा दावा देखील पटोले यांनी केला.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राची प्रतिमा दररोज मलिन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचा आम्ही निषेध करतो. महाविकास आघाडीच्या आजच्या बैठकीत या गंभीर मुद्यावर चर्चा झाली. त्यानंतर आम्ही या घटनेच्या निषेधार्थ २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्याचा निर्णय घेतला, अशी माहिती नाना पटोले यांनी दिली आहे. या बंदमध्ये महाविकास आघाडीचे सर्वच घटकपक्ष, शाळा, महाविद्यालये, विद्यार्थी, पालकांचा समावेश असेल, असा दावा देखील नाना पटोले यांनी केला आहे.बदलापूरमध्ये दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळीमा फासला गेला आहे. बदलापूरमधील ज्या शाळेत अत्यंत गंभीर व मन सुन्न करणारी घटना घडली ती शाळा भाजपा आरएसएसशी संबंधीत आहे. या शाळेची बदनामी होऊ नये म्हणून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. शाळेतील सीसीटीव्ही फुटेज गायब आहे. या प्रकरणी महाभ्रष्ट युती सरकारविरोधात महाविकास आघाडीने २४ तारखेला महाराष्ट्र बंदची हाक दिली असून जनतेने मोठ्या संख्येने या बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन नाना पटोले यांनी केले आहे.बदलापूरच्या अत्याचाराच्या घटनेने राज्यातील महिला मुलींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न




### २४ तारखेला महाराष्ट्र बंद ची हाक

**दोषीवर कठोर कारवाई करावी यासाठी बदलापूरमध्ये लोकांनी मोठे जनआंदोलन केले पण ते आंदोलनही दडपण्याचा प्रयत्न केला. राज्यात बाल अत्याचारांच्या घटनाही वाढल्या आहेत. भाजपा युती सरकार अत्यंत अकार्यक्षम, भ्रष्ट सरकार आहे या सरकारला जागे करण्यासाठी २४ तारखेला महाराष्ट्र बंद ची हाक दिली आहे. या बंदमध्ये मविआमधील सर्व घटक पक्ष सहभागी होणार आहेत. बदलापुरच्या पीडित कुटुंबाला न्याय देण्यासाठी डॉक्टर, वकील, पालक यांनीही या बंदमध्ये सहभागी होऊन सरकारच्या विरोधात आवाज बुलंद करावा असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले..**

पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आज महाविकास आघाडीच्या बैठकीत जागावाटपावर होणारी चर्चा रद्द करून राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना आणि महिला सुरक्षेवर चर्चा करण्यात आली. या बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षाताई गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, शिवसेना नेते खा. संजय राऊत, माजी मंत्री अस्लम शेख आदी उपस्थित होते.बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना बदलापूरच्या घटनेवर संताप व्यक्त करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भाजपा युती सरकारला सत्तेची गुर्मी चढली आहे. महिला अत्याचारांचे प्रमाण राज्यात प्रचंड वाढले आहे पण सरकार आपल्यात मस्तीत आहे. लाडकी बहिण म्हणून १५०० रुपये देण्यासाठी मोठ मोठे इव्हेंट केले जात आहेत पण बहिणींची सुरक्षा केली जात नाही. राज्य सरकार, गृहखाते, शासन आहे की नाही अशी परिस्थिती आहे. बदलापूरच्या घटनेत पोलीसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रार दाखल करण्यास गेलेल्या पीडित मुलीच्या आईला तासनसात पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवण्यात आले. पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत, सरकार कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, असे पटोले म्हणाले.

---

### नांदेड जिल्हातील अधिकाऱ्यांना

# तालुक्यांच्या ठिकाणी शासनातर्फे निवासांची व्यवस्था करण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**



नांदेड जिल्ह्यातील सर्व तहसीलदार गटविकास अधिकारी व इतर कर्मचाऱ्यासाठी शासनातर्फे निवासांची व्यवस्था करावी अनेक तहसीलदार ,गटविकास अधिकारी हे तालुक्याच्या ठिकाणी न राहता जिल्हाच्या ठिकाणी राहत आहेत यामुळे त्यांना येणे जाणे व इतर सर्व खर्च होत आहे त्यासाठी त्यांना तालुक्याच्या ठिकाणी शासकीय इमारत उभारून त्यांना मुख्यालयी राहण्यास सक्त आदेश द्यावेत. एका बाजूने शासनाचे घर भाडे घेऊन सुद्धा ती तालुक्याच्या ठिकाणी राहत नाहीत यामुळे तालुक्यातील अनेक नागरिकांना नाहक त्रास होत आहे संबंधित अधिकारी आपल्या मर्जीनुसार उशिरा येणे लवकर जाणे आल्यानंतर थकवा घालविणे यातच त्यांचा वेळ जात आहे तरी शासनाने तालुक्यांच्या ठिकाणी निवासांची व्यवस्था करून निवासी राहण्याचे सक्त आदेश द्यावेत असे निवेदन देऊन मा.जिल्हाधिकारी नांदेड यांना शासनातर्फे निवासांची व्यवस्था करावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जाधव व्यंकटराव, पांडुरंग कंधारे यांनी जिल्हाधिकारी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

---

# आ.तानाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक निधी मधून पांदण रस्ता पूर्ण झाल्याने

### गावकऱ्यांनी केले भाजपा युवा नेते शिवाजीराव यांचे स्वागत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील जयपूर येथे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक निधी मधून पांदन रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने भाजपा युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांचे जयपुर ग्रामस्थांनी स्वागत केले यावेळी उपस्थित भाजपा तालुका अध्यक्ष हिम्मत राठोड, शहराध्यक्ष विजय धाकतोडे भाजपा युवा नेते दिग्विजय खाडे ,शुभम खाडे, व भाजपा कार्यकर्ते पद अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते गेल्या अनेक वर्षापासून जयपुर येथील शेतकऱ्यांना पांदन रस्ता नसल्याने शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्याकरिता खूप मोठी कसरत करावी लागत होती जयपूर येथील ग्रामस्थांनी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे भेट दिली व लगेच पांदण रस्त्याला सुरुवात करून पांदण रस्ता पूर्ण झाल्याने जयपुर ग्रामस्थांनी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे स्वागत केले.

---

# लाडक्या बहिणी सकाळी सहा वाजल्यापासून बँकेसमोर उभ्या राहत आहेत रांगेत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर | विनायक कुटे**

आधार सेंडिग व केवायसी साठि लाडक्या बहिणी स्टेट बँक लोणार येथे सकाळी सहा वाजल्यापासून रांगा लावून उन्हा तान्हात उपाशी पोटी उभ्या राहुन आपली आधार सेंडिग व केवायसी करीत आहेत मुख्यमंत्री लाडकि बहिण योजनेचे पैसे खात्यात जमा होण्यासाठी आधार सेंडिग व केवायसी आवश्यक असल्याने उन्हात उभ्या रांगा लागल्या होत्या.सदर स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा लोणार मॅनेजर यांनी लाडक्या बहिणी साठि मंडप लावुन उन व पावसापासून संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी चर्चा लाडक्या बहिणी करतानी दिसत होत्या.

## चारोळी

एकीचे बळ दाखव सखी<br>
अंधाराला घाबरतेस कशाला<br>
तू ही जन्मदात्री, आधीशक्ती<br>
मग उगाच कोरड कसली घशाला.

**रंजना सानप**<br>
**मायणी (सातारा)**




---

### बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धेत

# चैतन्यच्या विद्यार्थ्यांची जिल्हा पातळीवर निवड





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर | मयूर ढोबळे**

येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयातील विद्यार्थ्यांची बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धेत जिल्हा पातळीवर निवड झाल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे यांनी वरील स्पर्धा जुन्नरच्या शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये आयोजित केल्या होत्या. बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांची जिल्हा पातळीवर निवड झाली आहे.अंजली योगेश खेत्री , प्रचिती योगेश इंगळे (बॅडमिंटन प्रथम क्रमांक)दर्शन विलास माळी(सतरा वर्ष मुले. बुद्धिबळ )संस्कृती दीपक अहिनवे (सतरा वर्ष मुली बुद्धिबळ)ओम बाळासाहेब आरोटे (१४ वर्ष मुले बुद्धिबळ)या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा विभाग प्रमुख शरद माळवे, देवचंद नेहे, अमित झरेकर, विजया गडगे यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, संजय हिरे, अनिल उकिरडे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले आहे.

---

### दै.लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवंत यांना

# राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण २०२४ पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा | प्रतिनिधी**

वंजारी महासंघाचे दुसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दिनांक २५ ऑगस्ट रोजी गंगा लान्स राष्ट्रसंत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहमदनगर येथे उत्साहात साजरे होणार आहे. या संमेलनासाठी संमेलन अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. सांगिता घुगे या लाभल्या असुन उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप हे लाभले आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून आंतरराष्ट्रीय कुस्ती पटू राजकुमार आघाव तर सह स्वागताध्यक्ष रेणुका वराडे असुन अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. या संमेलनात दैनिक लोकनेताचे संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण २०२४ हा पुरस्कार जाहीर !



गेल्या काही वर्षांपासून दैनिक लोकनेता तसेच विश्व फाउंडेशनच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात समाज प्रबोधन व समाजसेवा करणारा जनसेवक म्हणून ज्ञानेश्वर बुधवत हे नाव महाराष्ट्राला परिचित झालं आहे. छोट्याशा वयामध्येच यशस्वी तसेच विचारवंत लोकांचा सहवास लाभल्याने पत्रकारितेबरोबर समाजसेवेचे वेड लागले व तेंव्हाच फार कठीण परिस्थितीत दैनिक लोकनेता सारखं छोटंसं विचारपीठ सुरु करून अल्प वेळात महाराष्ट्र भर भरारी लोकनेताने घेतली. पण यामागे ज्ञानेश्वर बुधवत नावाचं शांत व संयमी वादळ होतं. याच धडाडीच्या कामाची दखल घेऊन वंजारी महासंघ महाराष्ट्र यांच्या मार्फत ' राष्ट्रसंत भगवान बाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण २०२४ ' हा पुरस्कार दैनिक लोकनेताचे संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांना नुकताच जाहीर झाला असून पुरस्काराचे वितरणदिनांक २५ ऑगस्ट रोजी गंगा लान्स, राष्ट्रसंत भगवानबाबा चौक, निर्मल नगर, अहमदनगर येथे होणार आहे. यामुळे ज्ञानेश्वर बुधवत यांचेवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पंचायत समितीच्या अनागोंदी कारभाराविरोधात पुरोगामी आक्रमक

## जवाब दो आंदोलनाने पंचायत समिती हादरली... गेट ला लावले कुलूप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

पंचायत समिती उमरखेड च्या अनागोंदी कारभाराविरोधात काल पुरोगामी युवा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी पंचायत समिती उमरखेड वर जवाब दो आंदोलन करीत गट विकास अधिकारी यांना जाब विचारला.

उमरखेड तालुक्यात मागील काही वर्षांपासून शासकिय योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत आहे. शासकिय योजनेत लाभार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात पैश्यांची मागणी केली जाते. शेतकऱ्यांना नाईलाजास्तव पंचायत समितीच्या शासकीय कर्मचाऱ्यांना आपला धनादेश काढण्यासाठी पैसे द्यावे लागत आहेत. यात अनेकांचा हिस्सा असतो. पंचायत समितीचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून गटविकास अधिकाऱ्यांची ही जबाबदारी असते की त्यांनी आपल्या तालुक्यात होणाऱ्या गैरव्यवहारावर अंकुश लावावा. परंतु याबाबत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हे कारवाईबाबत उदासीन दिसतात. पुरोगामी युवा ब्रिगेड ने सुद्धा अनेक वेळेस निवेदन देऊन सुद्धा गटविकास अधिकारी यांनी कुठलीच ठोस भूमिका न घेतल्यामुळे पुरोगामी च्या कार्यकर्त्यांनी थेट पंचायत समिती गाठत जवाब दो आंदोलन करीत गटविकास अधिकारी प्रवीणकुमार वानखडे यांना धारेवर धरले. आंदोलकांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात प्रमुख मागण्या केल्या असून यामध्ये सर्व शासकीय योजना पारदर्शकपणे राबवा, पंचायत समितीत दलालांचा हस्तक्षेप थांबवा, रोजगार हमी योजना फक्त कागदावरच न राबविता प्रत्यक्षात पारदर्शकपणे राबवा , पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मुज्जोरी व जनतेला देण्यात येणारी वाईट वागणूक थांबवावी , पंचायत समितीत बाहेर गावावरून ये-जा करणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे शासकीय निवासस्थानी राहणे बंधनकारक करावे , पंचायत समिती अंतर्गत होणारे सर्व बांधकाम हे इस्टीमेट नुसार करावे, शेतकऱ्यांकडून विहीरी, गोठ्या करिता कर्मचाऱ्यांनी एक रुपया सुध्दा मागू नये, पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांची शेतकऱ्यांकडून आर्थिक मागणी थांबवावी आदि मागण्या निवेदनात करण्यात आले. या आंदोलनात तालुक्यातील बंदिभागातील युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यामध्ये शाहरुख पठाण, परमेश्वर रावते पाटिल, भागवत सूर्यवंशी, अनिल हरणे, आतिश वटाणे, मनोज धुळध्वज, अंबादास गव्हाळे , नागराज दिवेकर, मुक्तार शाह, आश्विन राठोड, ताहेर शाह, गजानन गायकवाड, आकाश लोमटे, अंकुश हणवते, श्रीनिवास नरवाडे, दत्ता वऱ्हाडे, ओमकार सुकळकर, माजीद पठाण, शंकर गुंडेकर, विक्रम जाधव, शेख आमिन, आदि उपस्थित होते.




### आंदोलक येताच पंचायत समितीच्या गेट ला लावले कुलुप

आंदोलक युवकांची संख्या व आक्रमकता लक्षात घेता खबरदारीचे उपाय म्हणून पंचायत समितीच्या गेट वर कुलुप लावून फौज फाटा वाढविण्यात आला होता. गेट ला कुलुप लावून बंद केल्यामुळे काही काळ आंदोलन अधिकच चिघळले होते. युवकांनी यावर आक्षेप घेत विरोधात घोषणाबाजी केली. नंतर गट विकास अधिकारी स्वतः बाहेर येऊ आंदोलकांशी चर्चा केली.

**"पंचायत समिति ही लोकांच्या सेवेसाठी आहे. उत्पन्नाचे स्त्रोत नाहि. शासकीय योजनेतील दलाल आधीं हटवा. ही तर फक्त सुरूवात आहे. आम्ही इथेच थांबणार नाही. आठ दिवसांत पंचायत समितीने आमच्या मागण्या पुर्ण न केल्यास पंचायत समिती समोर आमरण उपोषण केलें जाईल. याबाबत लवकरच ग्रामविकास मंत्री व प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांची भेट घेणार**

**शाहरुख पठाण,प्रवक्ता, पुरोगामी युवा ब्रिगेड**

# निष्कारण आगीत तेल ओतू नका:पोलिसी अतिरेक झाला तर वेगळा विचार करावा लागेल

## आमदार जितेंद्र आव्हाड यांचा थेट इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र बंद होऊ नये, अशी आपली इच्छा असेल तर बदलापूरचे प्रकरण संवेदनशीलपणे सांभाळा; तिथे पोलिसी अतिरेक झाला तर मात्र वेगळा विचार करावा लागेल, असा थेट इशारा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिला आहे. बदलापूर आंदोलनात सहभागी झालेल्या ३०० जणांवर पोलिसांनी नाहक गुन्हे दाखल केले असल्याचा आरोपही आव्हाड यांनी केला आहे.

पोलिसांनी हा विकृत प्रकार दाबण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे साहजिकच जनता चिडली. वर त्याच जनतेला अटकही करणार, हा कुठला न्याय? बदलापुरात जे काही झाले ते पोलिस आणि शाळेची चूक असल्याचा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. बदलापुरात जे काही झाले ते पोलिस आणि शाळेची चूक असल्याचेही आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे. या संदर्भात आमदार आव्हाड यांनी एका पोस्टच्या माध्यमातून सरकारवर टीका केली आहे.

# शिरुर तालुक्यातील खंडाळे येथे सुभेदार राजेंद्र नरवडे यांच्या स्वागतासाठी जनसामान्याचा महासागर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**





शिरूर तालुक्यातील खंडाळे गावामध्ये माजी सैनिक नायब सुभेदार श्री राजेंद्र संभाजी नरवडे यांच्या सेवानिवृत्तीनतंर भव्य मिरवणुक काढण्यात आली. माजी सैनिकांच्या ताफ्याचे मंदिरासमोर आगमन होताच फटाक्यांची आतिषबाजी, पुष्पवृष्टि करून सैनिकांना मानवंदना देण्यात आली.ग्रामदैवत रोकडोबा महाराजांच्या महाआरतीने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराजांची महाआरती घेऊन शिवगर्जना देत सभेमध्ये देशभक्ती व राष्टभक्ती प्रेरित केली.

डीजेच्या आवाजातील मंत्रमुग्ध करणारी देशभक्तीपर गीते गावातील माता भगिनीच्या वतीने औक्षण करत पंचारती ओवळण्यात आली. गावातील माजी सैनिकांच्या ताफ्याच्या भव्य दिव्य आशा रॅलीचे थेट प्रक्षेपण ड्रोन द्वारे करण्यात आले होते.शिवव्याख्याते शिवश्री आकाश वडगुले यांनी आपल्या निवेदन शैलीत सर्वांना मंत्रमुग्ध करणाऱ्या वाणीतून सैनिक सुभेदार राजेंद्र नरवडे यांची कौटुंबिक परिस्थिती,जीवनपट,

सैनिक देशसेवा कार्यकाल,चालू कौटुंबिक वाटचाल कथन करत असताना कमी वयातच आर्थिक परिस्थिती हालाखीची असणाऱ्या काळातच अल्पशा आजाराने पितृछत्र हरपल्याने संपूर्ण जबाबदारी मातोश्री मुक्ताबाई नरवडे यांच्यावर आल्यानंतर त्यांनी मेजर, रमेश,दिनेश तीन मुलांचे संगोपन तुटपुंज्या शेतीवर करत कुटुंबाचा गाडा सुस्थितीत ठेवला.त्यांचें प्राथमिक शिक्षण खंडाळे गावातच झाले तर आठवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण रांजणगाव गणपती येथे झाले.विद्या विकास मंदिर निमगाव म्हाळुंगी येथे उच्च माध्यमिक कला शाखा विभागात बारावी पर्यंतचे शिक्षण झाले.७ जुलै २००० मध्ये भारतीय सैन्य दलात नियुक्त झाल्यानंतर सैनिकी प्रशिक्षण नाशिक,जबलपूर येथे झाले.पहिली पोस्टींग जम्मु-काश्मिर मध्ये झाली तेथे खडतर धोकादायक परिस्थितीत चार वर्षे देशसेवा केली.त्यानंतर ओरिसा व राजस्थान एक वर्ष, कारगिल, सियाचीन बंगलोर येथे चार वर्षे,तसेच जम्मू काश्मीर,सिक्कीम, राजस्थान,व दिल्ली आदी खडतर दुर्गम भागात २४ वर्षे अखंडपणे देशसेवा करुन अखेर नायब सुभेदार (च-उझ) या पदावर सेवानिवृत्त झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वडघुले यांनी केले.गावातील सरपंच, उपसरपंच व सर्व स्तरातील आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हजारोंच्या संख्येने जमलेला जनसमुदाय कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण बिंदू होता.उपस्थित सर्व माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला. या शुभप्रसंगी आंबेगाव बाजार समितीचे सभापती श्री.देवदत्त निकम,शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शिरूर आंबेगाव अध्यक्ष श्री.शेखरदादा पाचुंदकर पाटील,शिरूर आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा गटाचे अध्यक्ष श्री.मानसिंगभैय्या पाचुंदकर पाटील व अनेक नामवंत व्यक्तींनी आपली मनोगत व्यक्त केले.युवा पिढीला देशसेवेसाठी प्रेरणा, समाजाची देशाविषयी,सैनिका विषयीची भावना सदैव जागृत असावी हे विचार डोळ्यासमोर ठेवून आयोजन नियोजन जिवलग मित्र श्री.चांगदेव शेठ नरवडे(अध्यक्ष पाणलोट समिती खंडाळे),संपूर्ण नरवडे मित्रपरिवार आणि समस्त ग्रामस्थ खंडाळे यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन त्यांचे बंधू,उत्कृष्ट निवेदक तथा शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.रमेश नरवडे यांनी मानले.वंदे मातरम् घेत कार्यक्रमाची सांगता झाली.

## बाईपणाचा दिवा

किती अमानुष
किती भयावह
माणूसपणाला काळिमा फासणारे
डोके सुन्न अन उगाच आ वासणारे ...

स्त्री शक्तीची, उपासना भक्ती
कशासाठी?
मनाचं समाधान की दिखावा
काहीच समजत नाही....

चिरडून टाकलत तिचं सारं अस्तिव
लहान निष्पाप लेकरू
स्वप्न घेऊन जगणारी तरुणी
जिद्दीने अंधार तुडवत चालणाऱ्या तिलाही...

कुठे मिळतोय न्याय
कागदही उडवतोय खिल्ली
पुरावा शोध म्हणत
प्रत्येक ठिकाणी तिलाच नागवलं जातंय....

आवाज उठेल, मेणबत्या पेटतील
कोरडी सहानुभूती मीडियासमोर येईल
दिवस जातील तसे
सारेच कसे शांत होईल ....

ती गेल्यावर निर्भया, पीडिता,
आत्याचारित बालिका
वेगवेगळ्या नावानी तिचा पुकार होईल
मोकाट लांडग्याच्या शिकारीने मात्र
आणखी नवा बळी जाईल...

हे कुठवर, कधीच संपणार नाही का?
सारीच उत्तरे अनुत्तरीत
पण बयो तुला मात्र उठायला हवं
तुझ्याच अस्तित्वासाठी आतून पेटायला हवं....

आयुष्य म्हणजे नुसती सेल्फी नवे
तुलाच पुसण्याचे डाव मांडले जातात
राक्षसी वृतीपुढे हार मानूनी कित्येकजणी
नाईलाजाने त्याच प्रवाहात वाहतात..

आता हे सारं असह्य झालंय
कुठेतरी विचार करायला हवा
विकृती बदलणे शक्य नसले तरी
अंधारात पेटव एकतरी तुझ्या
बाईपणाचा दिवा...



– रंजना सानप
मायणी (सातारा )

# इंदू मिल येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची राज्यपालांनी केली पाहणी

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले व क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची उपस्थिती

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

गेल्या अनेक वर्षापासून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदु मिलच्या जागेवर आंतरराष्ट्रीय स्मारक व्हावे ही समाजबांधव व आंबेडकर प्रेमी जनतेची मागणी होती. त्यांच्या मागणीचा विचार करुन शासनाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम सुरु असुन काल इंदु मिल येथे महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले व



महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी स्मारकाची पाहणी केली.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल कंपाऊंड येथे निर्माण होत असलेल्या भव्य स्मारकाची पाहणी करुन विविध पदाधिका-यांची बैठक घेवुन सुचना देण्यात आल्या.

यावेळी मुंबई महानगर विकास प्राधिकरणातर्फे करण्यात आलेल्या सादरीकरणाचे वेळी राज्यपालांनी स्मारकाच्या निर्मितीच्या प्रगतीचा आढावा घेतला. स्मारकामध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी करण्यात येत असलेल्या सोयी सुविधा तसेच स्मारकाचे तीव्र वादळापासून संरक्षण होण्यासाठी केलेल्या उपाययोजनाबद्दल त्यांनी माहिती घेतली. इंदू मिल येथील भव्य स्मारकाचा संपूर्ण परिसर हा हरित असेल व तेथे ७५० ते ८०० मोठ्या वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. या स्मारक परिसराच्या ठिकाणी १००० व्यक्तींची आसन क्षमता असलेले भव्य सभागृह, चवदार तळ्याचे प्रतिरूप तळे तसेच ध्यानधारणा केंद्र, ग्रंथालय व भूमिगत वाहनतळ असणार आहे असल्याची माहिती यावेळी संबंधितांनी उपस्थित मान्यवरांना दिली.

यावेळी क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी, आज आपण समाजकारण व राजकारणात केवळ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या अधिकारामुळेच असुन त्यांनी दिलेल्या अधिकारामुळेच मी या राज्याच्या कॅबीनेट मंत्री पदापर्यंत पोहचलो आहे. येत्या काळात आंतरराष्ट्रीय दर्जाचे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक येथे होणार असुन आपल्या पुढच्या पिढीला या स्मारकामुळे प्रेरणा व बळ मिळणार असल्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

# मराठा-कुणबी आमदार निवडून आले तर ओबीसी आरक्षणाला धोका निर्माण होईल- आंबेडकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अकोला (वृत्तसंस्था)**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळावे, या मागणीला शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्यक्ष पाठिंबा आहे. त्यासाठी शरद पवार हेच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठबळ देत आहे, असे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा आणि कुणबी समाजाचे आमदार जास्त संख्येने निवडून आले तर ओबीसी आरक्षणाला धोका निर्माण होईल, असे एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी म्हटले आहे.प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, राज्यातील आगामी निवडणुकीनंतर विधानसभा सभागृहात मराठा आणि कुणबी आमदारांचे संख्यात्मक वर्चस्व विधानसभेत निर्माण झाले, तर नियोजनबद्ध पद्धतीने ओबीसींच्या जातनिहाय गणनेची मागणी मान्य करत जोवर गणना पूर्ण होत नाही, तोवर ओबीसी आरक्षण स्थगित ठेवले जाईल आणि ओबीसींना आरक्षणापासून वंचित केले जाईल.






# सरकारने किसान सन्मान योजनेची रक्कम १२ वरुन २४ हजार रुपये करावी-मा.आ.भिमराव धोंडे

## श्रीमती विजयाताई घुले यांच्या हस्ते डॉ.स्वामिनाथन यांच्या प्रतिमेची पुजा







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

किसान सन्मान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार रुपये मिळतात परंतु खते व औषधांची वाढलेले दर यामुळे शेतकऱ्यांना खर्च परवडत नाही त्यामुळे सरकारने ही रक्कम दुप्पट करून २४ हजार रुपये करावेत असे मत माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टी येथे व्यक्त केले.

दिनांक २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत आष्टी येथे होणाऱ्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या मंडप उभारणी मुहूर्त कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते, या वेळी प्रमुख उपस्थिती म्हणून केळ सांगवी येथील आदर्श महिला शेतकरी श्रीमती विजयाताई गंगाधर घुले, बाबुराव कदम, सदाशिव दिंडे, व्यापारी संघटनेचे नविन कासवा,कृषी व्यापारी संघटनेचे तालुकाध्यक्ष अमृत शेळके, श्री. बोंदार्डे, यशोदिप कन्स्ट्रक्शन कंपनीचे बाळासाहेब भुकन, सुधीर पारखे,
बंडू सातपुते, गणेश जठार, प्राचार्य श्रीराम आरसुळ, प्रा. खेभकर व इतर उपस्थित होते. आदर्श महिला शेतकरी श्रीमती विजयाताई घुले यांच्या हस्ते डॉ. स्वामिनाथन यांच्या प्रतिमेची पुजा करुन श्रीफळ वाढवुन अभिवादन करण्यात आले. मा. आ. भिमराव धोंडे यांच्या हस्ते श्रीमती विजयाताई घुले यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी बद्दल सत्कार करण्यात आला.

मराठवाड्यातील सर्वात मोठे व २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत होणाऱ्या डॉ.स्वामीनाथन दुसरे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन आष्टी येथील पंडित नेहरू विद्यालयाच्या प्रांगणात होत आहे.या प्रदर्शनाच्या भव्य मंडप उभारणीस प्रारंभ झाला आहे. पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, डॉ. स्वामिनाथन यांनी शेतकऱ्यांच्या मालाला जास्तीचा भाव कसा देता येईल यासाठी प्रयत्न केले.त्यांनी शेतीसाठी भरीव कार्य केले. त्यांनी गहु, तांदळाच्या जादा उत्पन्न देणाऱ्या जातींचे संशोधन केले. या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना शेती विषयक नवनवीन ज्ञान मिळेल, त्याचा आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी फायदा होईल. गतवर्षी सव्वा लाख शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला यावर्षी दोन लाख शेतकरी लाभ घेतील. आर्थिक उलाढाल देखील वाढणार आहे.शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना,किसान सन्मान योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत.शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत राज्य व केंद्र सरकारचे मिळून वार्षिक १२ हजार रुपये मिळतात परंतु शेती करणे आर्थिकदृष्ट्या अवघड झाले आहे त्यामुळे शासनाने शेतकरी सन्मान योजना रक्कम दुप्पट करुन वार्षिक २४ हजार रुपये द्यावेत असे माझे मत आहे.

कृषी मंत्री व पालकमंत्री धनंजय मुंडे, भाजपाच्या नेत्या आ. पंकजाताई मुंडे,आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे.सांगली येथील व देशातील सर्वात उंच ४१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे तर ठराविक रक्कम भरून शेतकऱ्यांना वीस किलोमीटर अंतर हेलीकॉप्टरने हवाई सफरीचा आनंद घेता येईल. चार दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घेऊन आपल्या शेतीसाठी उपयोग करावा. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढतच राहिली तर भविष्यात अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल यामध्ये अन्नधान्य,पाणीप्रश्न निर्माण होईल.अनेक समस्या निर्माण होतील यावर उपाय करण्यासाठी केंद्र सरकारने तज्ञांची समिती गठीत करावी त्यामध्ये प्रत्येक राज्यातील एका तज्ञांचा समावेश करावा.१९४७ साली भारत, पाकीस्तान, बांगलादेश ,मॅनमार या सर्वांची मिळून लोकसंख्या ३२ कोटी होती.आज ७५ वर्षात फक्त भारताची लोकसंख्या सुमारे १५० कोटींवर पोहोचली आहे. इतर देशांची मिळून २०० कोटी असु शकते आणखी पुढच्या ८० ते १०० वर्षात हीच लोकसंख्या ८०० ते ९०० कोटीवर जाऊ शकते.परंतु जमिनीचे क्षेत्र मात्र तेवढेच राहणार आहे.त्यामुळे भविष्यात अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.वाढत्या लोकसंख्येमुळे संपूर्ण देशाच्या यंत्रणेवर ताण येतो.वाढती महागाई,आरोग्य सेवा, शिक्षण,बेरोजगारी,गरीबी, भूकबळी असे बरेच प्रश्न उभे राहतात.वाढत्या लोकसंख्येमुळे सरकारच्या योजना प्रत्येकापर्यंत पोहोचणे देखील कठीण होते. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन माहिती मिळते शेतीसाठी लागणारे नवनवीन अवजारे,जास्त उत्पन्न घेण्यासाठी नवनवीन माहिती अशा प्रदर्शनामधून मिळते असेही मा.आ.भिमराव धोंडे सांगितले.

# उमरखेड येथे आज वंचित बहुजन आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**





होऊ घातलेल्या उमरखेड विधानसभा निवडणुकीची तयारी करण्याच्या दृष्टिकोनातून आज दिनांक २२ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी २: १५ वाजता वंचित बहुजन आघाडीची उमरखेड विधानसभा स्तरीय बैठक आयोजित करण्यात आली या बैठकीला मार्गदर्शक म्हणुन जिल्ह्याचे निरीक्षक ड.प्रियदर्शी तेलंग कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हाध्यक्ष पांडुरंग मेश्राम प्रमुख उपस्थितीत जिल्हा महासचिव डी के दामोधर, जिल्हा उपाध्यक्ष मौलाना सय्यद हुसेन जिल्हा कोषाध्यक्ष लक्ष्मण जाधव उमरखेड तालुका अध्यक्ष संबोधी गायकवाड, महागाव तालुका अध्यक्ष प्रल्हादराव नवसागरे यांच्यासह विधानसभा क्षेत्रातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. तेव्हा उमरखेड व महागाव तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना कळविण्यात येते की उद्या होणाऱ्या महत्वपूर्ण बैठकीस आपण सर्वांनी आवर्जून उपस्थित रहावे ही विनंती.

दिनांक २२/८/२०२४
स्थळ: संजोग भवन उमरखेड
वेळ दुपारी २:१५ वाजता
टीप:सभा वेळेवरच चालू होईल

# रक्षाबंधन दिनी बंटी उगलमुगले सरांनी मिळवला हजारो बहिणींचा आशीर्वाद

■लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



कालिंका देवी महाविद्यालयात शिक्षक असलेले जितेश उगलमुगले (बंटी सर) यांनी गेल्या ०३ वर्षापासून शिक्षण क्षेत्रामध्ये शिरूर तालुक्यासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन करून शिक्षणाचे महत्व पटवून देऊन, विद्यार्थ्यांना वाईट गोष्टी पासून लांब ठेवण्याच्या प्रयत्नामध्ये ते खूप मनातून मेहनत घेत आहेत. पहिली पासून ते डिग्री पर्यंत बंटी सरांचे शिक्षण कालिका देवी महाविद्यालय मध्ये झालेले असल्यामुळे विद्यार्थी चुका कुठे करतात हे त्यांना नक्कीच समजलेले आहे. आणि या गोष्टीचा फायदा शिरूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना होताना दिसत आहे. रक्षाबंधना निमित्त बंटी सरांच्या हातामधे हजारो राखीची संख्या दिसत आहे. हजारो बहिणींचा आशीर्वाद मिळवणे हे नक्कीच खूप निस्वार्थ मनाचे काम आहे.

पूर्ण शिरूर(कासार) तालुक्यातील विद्यार्थीला चांगले शिक्षण देऊन, त्यांना मोठ-मोठ्या अधिकारी पदावर जाताना पाहायचे आहे असे बंटी सरांचे स्वप्न आहे. आणि या साठी त्यांनी सकाळी ०६:०० वाजता एमपीएससी ची बेसिक तयारी करून घेण्यासाठी मोफत क्लासेस सुरू केले आहेत. ज्या मध्ये अती कष्टाळू आणि अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणारे विद्यार्थी येऊन अभ्यास करतात, आणि स्वतः विद्यार्थी सुध्दा शिकवतात. रक्षाबंधन निमित्त कोण बनेगा टॉपर हा गेम घेऊन सात टीम करून त्यांना मराठी ग्रामर, महाराष्ट्राचा भूगोल, भारतीय राज्यघटना, महाराष्ट्रचा इतिहास, समाजसुधारक, उच्च दर्जाचे गणित, अश्या वेगवेगळ्या विषयाचा समावेश करून लहान वयातच विद्यार्थ्यांना गेम च्या माध्यमातून आवड निर्माण व्हावी या साठी बंटी सर प्रयत्न करताना दिसत आहे. तसेच विजेत्या टीम ला पाच हजार रुपयाचे बक्षीस सुध्दा देण्यात आले आहे.

# माझे पोलिस संरक्षण काढून जनतेला द्या बदलापूर प्रकरणावर सुप्रिया सुळे संतप्त

## देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडत चालली आहे. त्यामुळे पोलिसांवर प्रचंड तणाव येतोय. त्यातच राजकीय नेत्यांना पोलिस संरक्षण दिले जात आहे. त्यामुळे माझे पोलिस संरक्षण काढून ते जनतेच्या सेवेत द्यावे, असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अशी विनंती केली आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्यात प्रचंड गुन्हेगारी वाढली आहे, असे केंद्र सरकारचा डेटा सांगत आहे. महिला अत्याचाराचा विषय खूप गंभीर होत आहे. जनता रस्त्यावर आल्यानंतर सरकारला जाग आली. शक्ती कायदा जो मविआच्या काळात आणला होता त्यांचे या सरकारने काय केले असा सवाल सुळेंनी उपस्थित केला आहे.

खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती गेली काही महिन्यांपासून अतिशय गंभीर आहे. जनता असुरक्षित वातावरणात जगत असून सततच्या अप्रिय घटनांमुळे नागरिकांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण आहे. महिला, अबालवृद्ध कुणीही सुरक्षित नाहीत. गुन्हेगार निर्ढावले असून कायद्याचा धाक उरलेला नाही. यंत्रणा राबविताना पोलिस यंत्रणेवर प्रचंड मोठा ताण पडतोय,हे स्पष्टपणे दिसत आहे.

दुसरीकडे माझ्यासह अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधींच्या सुरक्षेसाठी मोठी पोलीस यंत्रणा काम करत आहे. परंतु एका बाजूला कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलीस यंत्रणेचं बळ कमी पडत असताना दुसरीकडे हि सुरक्षा घेणं योग्य नाही. म्हणून गृहमंत्र्यांना माझी विनंती आहे की कृपया माझ्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेली पोलीस सुरक्षा तातडीने काढून घ्यावी. माझ्या सुरक्षेसाठी दिलेले हे पोलीस अधिकारी जनतेच्या सुरक्षेसाठी नियुक्त करावेत.यासोबतच राज्यातील ज्यांना ज्यांना सुरक्षा व्यवस्था दिली आहे त्या सर्वांच्या सुरक्षेच्या गरजेबाबत तातडीने आढावा घ्यावा व ज्यांना गरज नाही, त्यांची सुरक्षा काढून ते पोलिस कर्मचारी जनतेच्या सुरक्षेसाठी देण्यात यावे.

# धर्माबाद तालुक्यातील प्रसिद्ध देवस्थान श्री रोकडेश्वर मंदिर पाटोदा बु.येथे नारळ फोडून उद्योगरत्न मा.मारोतराव पाटील कवळे गुरूजी शेतकरी संवाद दौरा सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**





श्री रोकडेश्वर मंदिर पाटोदा बु ता.धर्माबाद येथे मा.उद्योगरत्न मारोतराव पाटील कवळे गुरूजींनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी गुरूजी वर प्रेम करणारे सर्व शेतकरी तरूण गावोगावी जावून माहिती देण्याचे काम करीत आहेत.

आज शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत शेतीसाठी पाण्याचा प्रश्न आहे, २४ तास थ्री फेज विज पाहिजे, सोयाबीन, कापूस, हरभरा पिकाला हमीभाव नाही असे अनेक प्रश्न अडचणी आहेत या जर अडचणी सोडवायचे असेल तर गरिबीची जान असलेला सर्वसामान्य माणूस सत्तेत जर आला तरच हे प्रश्न सुटतील अन्यथा सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले किंवा घराणेशाही चा माणूस हे आपले प्रश्न सोडवू शकत नाही, त्या गरिबीची जान असलेला..

एक सर्वसामान्य शेतकऱ्यांचा मुलगा शुन्यातून विश्व निर्माण केले, ३ साखर कारखाने, दुधसंघ आणि अनेक पतसंस्था चालवितो हे सर्व तरूण शेतकरी पुत्रासाठी प्रेरणादायी आहे मित्रांनो.गंगापट्टी च्या ऊस तर मोठ्या प्रमाणात वाढला पण त्याची मोठी हाल झाली त्याला गाळपाला घालताना ऊसासोबत शेतकरी पिळूण निघाला, शेतकर्यांनी दुधाचे उत्पादन घेतले पण त्याला घेणारेच कोणी नव्हते, शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी बँका पुढे येत नव्हत्या त्यावेळी 'उद्योरत्न मा.मारोतराव पाटील कवळे गुरूजी' सारखा शेतकरी पुत्र पुढे आला आणि त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळू लागला, दुधाला चांगला दर मिळाला, पतसंस्थेच्या माध्यमातून मा.गुरूजीने अनेक सर्वसामान्य शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले आणि त्यातून सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये बदल दिसू लागला आहे. गेल्या हंगामध्ये ऊसाला नांदेड जिल्ह्यामध्ये सर्वात विक्रमी असा २८०० रूपयांपर्यंत चा भाव दिला, ते इतर कुठल्याही साखर कारखानदाराला शक्य झाले नाही ते मा.गुरूजीच्या माध्यमातून झाले. आपल्या भागातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला यांच्या जिवनामध्ये सोन्याचे दिवस आले पाहिजे हे मा.मारोतराव पा.कवळे गुरूजींचे ध्येय आहे.आज शेतकऱ्यांच्या अनेक अडचणी आहेत मित्रांनो मग त्यामध्ये विजेचा प्रश्न असेल, शेतीला रस्त्याचे प्रश्न असतील, हमीभावाचे प्रश्न असतील असे अनेक प्रश्न आहेत ते जर सोडवायाचे असतील तर सर्वसामान्य शेतकऱ्यांचा मुलगाच सत्तेत पाहिजे तरच आपले प्रश्न मार्गी लागतील, घराणेशाही आणि सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेला मुलगा सोडवू शकत नाही त्यासाठी गरीबीची जान असल्याला सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलाला सत्तेत न्यावे लागते मित्रांनो..

त्यासाठीच,मा.मारोतराव पाटील कवळे गुरूजींना विधानसभेत पाठवावे लागेल..

# अनुसूचित जाती-जमाती आरक्षण संदर्भातील क्रिमिलियर अट रद्द करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती-जमाती आरक्षण उपवर्गीकरणाच्या व क्रीमिलेयर संदर्भात दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांपैकी सहा न्यायधिशांच्या खंडपीठाने जो निर्णय दिला आहे. हा निर्णय असंविधानिक व समानतेच्या तत्त्वाचे उल्लंघन करणारा आहे. राज्यांवर थोपविण्यात आलेला हा आदेश एससी- एसटी मधील जाती-जातीत संघर्ष पेटविणारा आहे. उपरोक्त निर्णय संसदेने तात्काळ रद्द करून उपवर्गीकरण न करता अंमल बजावणी करावी. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत प्रत्येक घटकातील सर्व प्रवर्गाचा विचार करून समान न्याय देण्याचे काम केले आहे. देशात एकसंघता टिकून राहण्यासाठी तयार केलेल्या तरतुदींना आता उपवर्गीय करण्याचा घाट सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयामुळे होत असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी एससी- एसटी घटक हा प्रशासनाचा भाग नव्हता म्हणून त्यांच्यासाठी तयार केलेले न्यायिक धोरण हे अन्याय दूर करण्यासाठी होते. परंतु घटकाला श्रेणी वर्गीकृत केले तर समानतेच्या तत्वाचे उल्लंघन होणार. एससी -एसटी आरक्षणास 'क्रीमीलेयर' आर्थिक निकष लावण्यास रिपब्लिकन सेना चा तीव्र विरोध आहे. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळे सात दशकाहून अधिक काळ राबवल्या गेलेल्या आरक्षणाच्या धोरणाचा फायदा प्रत्येक वर्गाला मिळत आहे. परंतु १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयाचा सर्वच स्तरातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे. या निर्णयामुळे सामाजिक स्तरावर चिंता व्यक्त करण्यात येत असून समाजात प्रचंड असा रोष



आहे. तेव्हा या समाज विघातक निर्णया संदर्भात योग्य तोडगा काढण्यासाठी मा. प्रधानमंत्री साहेबांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावून अनुसूचित जाती- जमाती आरक्षण संदर्भातील उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन सेना वतीने या निवेदनाद्वारे करण्यात येत आहे. आज दिनांक २१ ऑगस्ट रोजी विविध सामाजिक संघटना व पुरोगामी विचारांच्या पक्षाच्या वतीने भारत बंद चे आवाहन करण्यात आलेले आहे, त्याचाच भाग म्हणून रिपब्लिकन सेना बिलोली तालुक्याच्या वतीने जाहीर पाठिंबा देऊन आंदोलनात सहभागी आहोत.

तरी मा.प्रधानमंत्री साहेबांनी आमच्या निवेदनाचा गांभीर्याने विचार करून देशातील सामाजिक सलोखा अबाधित राहण्यासाठी लवकरात लवकर पावले उचलावीत ही विनंती.अन्यथा रिपब्लिकन सेनेच्या वतीने उपवर्गीकरण व क्रिमिलेयर निर्णयाच्या विरोधात देशभर आंदोलन छेडण्यात येईल. आसा इशारा रिपब्लिकन सेना शहराध्यक्ष गंगाधर इबितकर, कपिल भेदेकर, मारोती कांबळे,रवी कांबळे, बाळासाहेब लाखे, पीपल्स रिपब्लिकन पार्टी तालुका अध्यक्ष जयपाल काळे, मुन्ना भालेराव, धम्मपाल काळे, सुदर्शन भालेराव, विजय काळे, प्रविण केसराळीकर युवाअध्यक्ष, शुध्दोधन वाघमारे,आलिम शेख , आदींनी निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

## स्वतंत्र महाराष्ट्राच्या लढ्यात साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे महत्वपूर्ण योगदान-सौ.आशाताई शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

तालुक्यातील चोंडी येथे काल दि. २१ ऑगस्ट रोजी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे यांच्या हस्ते लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे व सर्व महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले, यावेळी आशाताई शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, यावेळी बोलताना आशाताई शिंदे म्हणाल्या की स्वतंत्र महाराष्ट्राच्या लढ्यात लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असून अण्णाभाऊंनी समाजातील वंचित उपेक्षित, पिडित, शोषितांचा आणि कामगारांचा दबलेला आवाज बुलंद करण्याचे महान कार्य केलेले आहे, अण्णाभाऊंच्या अनेक कादंबऱ्या व साहित्य आजच्या पिढीला सदैव प्रेरणादायी असून समाजातील विद्यार्थी व तरुणांनी व समाज बांधवांनी अण्णाभाऊंचा त्याग व आदर्श डोळ्यासमोर ठेवून ध्येय



साध्य करण्याचे आवाहन यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शिंदे यांनी बोलताना केले, यावेळी आशाताई यांनी सर्व समाज बांधवांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या, यावेळी आमदार शिंदे कुटुंबीय कोणतीही जात,पात धर्माला कधीही अधिक महत्त्व देत नसून आमदार शिंदे कुटुंबीयांची माणुसकी हीच जात व धर्म आहे, आम्ही माणुसकीलाच अधिक महत्त्व महत्व देतो, आम्ही शिंदे कुटुंबीय मतदारसंघाच्या सर्वांगीण हितासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे ग्वाही यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शिंदे यांनी बोलताना दिली ,यावेळी माळाकोळी चे सरपंच मोहन काका शूर, लोहा समन्वय समिती सदस्य सिद्धू पा. वडजे, मनोज पा. भालेराव, फैयाज शेख, खाबेगावचे सरपंच संदीप पा. पौळ, व्यंकटी पा. आढाव, फुलाजी पा. ताटे, सरपंच राम पा. शिरसाट, चोंडीचे सरपंच संतोष पा. जाधव, सतीश पा. कराळे, माजी नगरसेवक लक्ष्मण शेळके, प्रसाद पा. जाधव, जयंती मंडळाचे अध्यक्ष तातेराव गोरे ,देविदास गोरे ,तंटामुक्ती अध्यक्ष नागोराव पा. जाधव, लक्ष्मण प्रेमलवाड सह जयंती मंडळाचे पदाधिकारी, गावकरी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शिरूर आंबेगाव तालुका युवक उपाध्यक्षपदी विकास फंड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र व औदौगिकीकरणासाठी प्रशिद्ध असलेल्या रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथील विकास संजय फंड यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या शिरूर आंबेगाव तालुका युवक उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली. पक्षाचे कार्याध्यक्ष देवदत्त निकम यांनी विकास फंड यांची निवड केली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते हे निवडपत्र विकास फंड यांना देण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी आजवर दिलेले योगदान लक्षात घेऊन आंबेगाव राष्ट्रवादी काँग्रेस शिरूर - शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक उपाध्यक्ष पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे निकम यांनी सांगितले. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार यांचे विचार राज्यात पोहोचविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असे फंड यांनी निवडीनंतर सांगितले. यावेळी खासदार अमोल कोल्हे,



महिला प्रदेश अध्यक्षा रोहिणी खडसे, मेहबूब शेख, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, जगन्नाथ शेवाळे, दामूअण्णा घोडे, कुमार महाराज नाणेकर, रांजणगाव सोसायटीचे माजी चेअरमन उत्तमराव कुटे, पांडुरंग खेडकर, तुषार शेळके, गणेश पाचुंदकर, सचिन कुटे, सोमनाथ बांदल,अनिल फंड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## सरपंच संघटनेच्या वतीने युवा उद्योजक संदिप पाटील कवळे यांचा सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

पुरोगामी सरपंच संघटना महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित आदर्श सरपंच सन्मान सोहळा २०२४ गिरीश भाऊ देशमुख गोरठेकर सभागृह येथे संपन्न झाला. यावेळी सरपंच संघनेच्या वतीने युवा नेते संदीप पाटील कवळे यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सिंधी येथील ज्येष्ठ कार्यकर्ते गोविंदराव पाटील कवळे, तर या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून युवा नेते संदीप पाटील कवळे , स्वागत अध्यक्ष डॉ. बेलकर साहेब, प्रमुख पाहुणे म्हणून मार्केट

कमिटीचे उपसभापती प्रल्हाद पाटील ढगे, प्रकाश पाटील चिंचाळकर, समाज भूषण किशन दादा



गायकवाड तसेच तालुक्यातील सर्व सरपंच व जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.यावेळी तालुक्यातील सर्व सरपंच मान्यवरांचा सत्कार करून आदर्श सरपंच सन्मान सोहळा संपन्न झाला.

## बदलापूर येथील घडलेल्या घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी

### मंठा शिवसेना (उबाठा) वतीने तहसीलदारांना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

बदलापूर येथे बालिकांवर अत्याचाराची घटना घडली असून या घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी मंठा शिवसेना (उबाठा) च्या वतीने करण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार मंठा यांना निवेदन देण्यात आले असून बदलापूर येथे चार



वर्षीय बालिकांवर शाळेमध्ये घडलेली अत्याचाराची घटना ही अत्यंत निंदनीय स्वरूपाची असून मंठा तालुक्यात शिवसेनेच्या वतीने तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. राज्य शासन लाडकी बहीण योजना आणून आपले पाप झाकण्याचा प्रयत्न करीत आहे. २०१९ ते २०२४ या कालावधीमध्ये राज्यात अन्याय अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या मात्र, त्यांना न्याय देण्यास शासन असमर्थ ठरले आहे. या घटनेतील आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर माजी उपनगराध्यक्ष बालासाहेब बोराडे, माजी सभापती संतोष वरकड, शहरप्रमुख वैजनाथ बोराडे, नगरसेवक प्रदीप बोराडे, बाजभाई पठाण, अचीतराव बोराडे, विकास सूर्यवंशी, जे के कुरेशी, उबेद बागवान, पप्पू दायमा यांच्या सह्या आहेत.

## बदलापूर येथील घटनेचा दौंड मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने निषेध

### जिल्हाप्रमुख शरद सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली निषेध आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

:-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने दौंड येथे बदलापूर जिल्हा ठाणे येथील घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.भाजपच्या जिल्हा पदाधिकारी याच्या खाजगी शाळेतील छोट्याशा चिमुकलीवर जो अनुमानुष प्रकार घडला. त्यानंतर बारा तासापेक्षा जास्त उशिराने पोलिसांनी तक्रार नोंदवली त्याबद्दल तमाम महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने तीव्र निषेध केला.

दौंड विधानसभेतील शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख शरद सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली निषेध आंदोलन करण्यात



आले.यावेळी घटनाबाह्य मिंदे,फडतूस,पवार सरकारचा नावाने घोषणाबाजी करत जाहीर निषेध करण्यात आला.

उपस्थित महिला भगिनींनी गृहमंत्री फडणवीस यांची तीव्र शब्दात निंदा केली. हे सरकार एकीकडे महिलांच्या मतांवर डोळा ठेवून आमिष दाखवत असताना दुसरीकडे त्यांची सुरक्षा करताना बेजबाबदार पणे वागत आहे.हे सरकार मतलबी,ढोंगी आहे असा सरकारवरती घणाघात केला. उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.यावेळी जिल्हाप्रमुख शरद सूर्यवंशी यांच्यासोबत उपजिल्हाप्रमुख अनिल सोनवणे,महिला आघाडी जिल्हा संघटक ज्योती गाडे,तालुका संघटक संतोष जगताप,तालुका समन्वयक शंकर शितोळे,युवा सेनेचे तालुका उपाधिकारी किरण वाळुंजकर, अमोल भागवत,संतोष मंडले,संतोष रणवरे, शिवाजी साळुंखे,अमोल भागवत,शहर प्रमुख आनंद पळसे,गोटया दळवी,दीपक विघ्ने,आनंत उंडे,विद्या घायाळ,रोहिणी वाळके राजेंद्र राजपूत,आदी शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

## श्री संत भगवान बाबा जयंती निमित्त इंद्रप्रस्थ कॉलनी येथे ह.भ.प.मोहन खरमाटे महाराज यांचे किर्तन व महाप्रसादाचे आयोजन

### शहरातील भाविक भक्तांनी सुश्राव्य किर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा-डॉ राजेंद्र सानप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । शेख महेशर**

राष्ट्रसंत श्रीसंत भगवान बाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी, बीड येथे मागील गेल्या १७ वर्षापासुन प्रतिवर्षी राष्ट्रसंत भगवानबाबा यांची जयंती साजरी करण्यात येते. या ही वर्षी बाबांचा जन्म उत्सव व या निमित्त प्रतिष्ठान आयोजित भावार्थ रामायण किष्किंधा कांड या ग्रंथाची सांगतेचा कार्यक्रम करण्यात येत आहे. या निमित्तमुर्ती अभिषेक आरती सकाळी-११ ते०१ या वेळेत बाबांच्या जीवन चरीत्रावर जेष्ठ किर्तनकार ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे यांचे सुश्राव्य किर्तन व किर्तना नंतर महाप्रसादाच्या पंगतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ शहारातील व परीसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा. असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी, बीड चे अध्यक्ष डॉ.राजेंद्र भाऊ सानप यांनी व त्यांच्या सर्व सहकारी भाविक भक्त यांनी केले आहे.




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904